# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ५५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २६/३/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २९०७**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) चा माहे फेब्रुवारी २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/१२१६१ दि. १४/३/२०१९ चे पत्र.

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. २९०८**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/१२/२०१८ चे पत्र.

यंदाच्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळाची स्थिती निमार्ण झालेली आहे. शासनाने सुध्दा दुष्काळ जाहिर केलेला आहे. अशा परिस्थितीत पुणे शहरावर सुध्दा पाणी कपातीचे संकट आलेले आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चारही धरणांमध्ये पाणीसाठा कमी झालेला आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी काटकसरीने व काटेकोरपणे वापरावे लागणार आहे. येणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते.

त्यासाठी आत्ताच पुणे महानगरपालिकेने पाऊले उचलून पुणे शहरात होत असलेली कॉंक्रिट रस्त्यांची कामे व गल्लीबोळ कॉंक्रिटीकरण करणे किंवा तत्सम कामे ज्याला पाणी मुबलक लागते अशा कामांना बंदी घालावी व दुष्काळ्याचा परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी योग्यती तयारी करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि.२१/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

### संकिर्ण

**विषय क्र. २९०९**

मा.महापौर व मा.गटनेते शिवसेना यांचे कार्यालयात तसेच मा.स्थायी समिती सभा व मा.महिला व बाल कल्याण समिती सभाप्रसंगी मागविणेत आलेल्या चहापान व खाद्यपदार्थ यांचे बिलास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/नस/१६५८ दि. १६/३/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २९१०**

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये सादर झालेली खरेदी सुचना व मे.महाराष्ट्र शासनाने कायम करणेत आलेली परचेस नोटीस पुणे मनपाकडे दाखल होत असतात. त्यामुळे कलम १२७ चे बाबत मुख्य सभा ठराव क्र. ३४ दि.२२/६/२००६ च्या धर्तीवर कलम ४९ अंतर्गत खरेदी सूचना बाबत परचेस नोटीसचे अनुषंगाने भू–संपादन कार्यवाही करणेसाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली अवलंबिणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/१६६६ दि. १८/३/२०१९ चे पत्र.

१)मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीस आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात विषयपत्र स्थायी समितीकडे सादर करणेस

२)मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र सादर झाल्यापासून एक महिन्यात मा.स्थायी समितीने मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेस

३)मा. स्थायी समितीने जर एक महिन्यात निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी सदरचा विषय मा.मुख्य सभेकडे पाठविणेस

४) मा.मुख्य सभेने जर याबाबत दोन महिन्याच्या मुदतीत निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीसबाबत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस

**विषय क्र. २९११**

पुणे, पेठ बालेवाडी स.नं. ३४ (भाग) व ३५ (भाग) येथील उद्यान (जी–१) आरक्षण क्षेत्रापैकी ताब्यात आलेले क्षेत्र वगळून उर्वरित सुमारे २९९०५.०० चौ.मी. आरक्षित जागा भूसंपादन कायद्यानुसार ताब्यात घ्यावी लागणार आहे. तरी जागामालक देवी कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री.विनोद बाणी यांनी पुणे म.न.पा.स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/१६६७ दि. १८/३/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २९१२**

ऑडीट उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.७९७७ दि. १९/३/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २९१३**

अपिल उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.७९७६ दि. १९/३/२०१९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**